# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः06.11.2024** **वारःबुधवार**

---

1. राज्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू; महायुती, महाविकास आघाडीच्या नेत्यांचा प्रचाराचा धडाका
2. वंचित बहुजन आघाडीच्या निवडणूक जाहीरनाम्याचं पुण्यात प्रकाशन
3. संसदेचं हिवाळी अधिवेशन येत्या 25 नोव्हेंबरपासून
4. राज्याच्या पोलीस महासंचालकपदी संजय वर्मा यांची नियुक्ती आणि
5. यंदाचं विष्णुदास भावे गौरव पदक ज्येष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना प्रदान

**प्रचार**

विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या दिग्गज नेत्यांनी काल प्रचाराचा नारळ फोडला. तर वंचित बहुजन आघाडीनं काल जाहीरनामा प्रसिद्ध केला.

महायुतीतर्फे शिवसेनेचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्याचबरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी कोल्हापूरमध्ये एकत्रित जाहीर सभा घेत प्रचाराचं रणशिंग फुंकलं. राज्यात महिला, शेतकरी, युवा यांच्यासह विविध घटकांसाठी राबवलेल्या कल्याणकारी योजनांचा लेखाजोखा यावेळी तीनही नेत्यांनी मांडला. त्याचवेळी विरोधकांवर जोरदार टीकाही केली.

तत्पूर्वी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूर आणि साताऱ्यातील विविध मतदारसंघात जाहीर सभा घेतली. महायुती सरकारनं सुरू केलेली एकही योजना आम्ही बंद करणार नाही, असं शिंदे म्हणाले.

देवेंद्र फडणवीस यांची काल नागपूर दक्षिण आणि पश्चिम मतदारसंघात प्रचार फेरी झाली. माझ्या लाडक्या बहिणी मला नक्कीच मतदान करतील असा विश्वास व्यक्त करत फडणवीस यांनी यावेळी काँग्रेसवर जोरदार टीका केली.

महायुतीच्या जागावाटपानंतरही अपक्ष म्हणून काही उमेदवार उभे राहिले असून त्याबाबत परस्पर सामंजस्याने तोडगा काढू असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.

भाजपच्या माजी खासदार हिना गावित यांनी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. गावित यांनी अक्कलकुवा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे. हा मतदारसंघ, जागा वाटपात शिवसेनेला मिळाला आहे.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनीही काल राज्यात ठीकठिकाणी जाहीर सभा घेऊन प्रचाराचा प्रारंभ केला. यापुढे आपण कोणतीही निवडणूक लढणार नाही, असं राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल बारामती तालुक्यात बोलताना सांगितलं. महाराष्ट्रात नव्या नेतृत्वाची फळी उभी करण्याचा संकल्प आम्ही केला आहे; असं ते म्हणाले. महाविकास आघाडीचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.

कॅाँग्रेसतर्फे प्रचाराचा प्रारंभ आज कॅाँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे आणि नेते राहुल गांधी यांच्या उपस्थितीत होणार आहे. नागपुरात 'संविधान सन्मान संमेलन' आणि संध्याकाळी मुंबईत 'महाराष्ट्र स्वाभिमान सभा' घेण्यात येणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे हे देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत.

तत्पूर्वी काल माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोल्हापुरातून प्रचाराला सुरुवात केली. राधानगरी इथं जाहीर सभा घेत त्यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला. आताची लढाई ही महाराष्ट्र प्रेमी आणि महाराष्ट्र द्रोही यांच्यातली लढाई आहे असं उद्धव ठाकरे म्हणाले. ठाकरे यांनी काल रत्नागिरी शहरातही प्रचार सभा घेतली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी काल यवतमाळ जिल्ह्यात राळेगाव मतदार संघात प्रचार सभा घेतली. गेली अनेक वर्ष या भागात आपण येत आहोत; मात्र इथले प्रश्न अजूनही तेच आहेत; असं राज ठाकरे म्हणाले. आत्महत्या करणाऱ्यांच्या घरच्या परिस्थितीचा विचारही करवत नाही. पण ही परिस्थिती ज्यांच्यामुळे येते अशा लोकांना शिक्षा देणार आहात का नाही? असा सवाल उपस्थित करत मनसेच्या उमेदवारांना मतदान करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

एम आय एम पक्षाचे नेते खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी धुळ्यात जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी भाजपा आणि महायुती सरकारवर टीका केली.

**<u>वंचित जाहीरनामा</u>**

महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित असलेला वंचित बहुजन आघाडीचा 'जोशाबा समतापत्र' या नावाचा निवडणूक जाहीरनामा काल पुण्यात, पक्षाचे अध्यक्ष ॲडव्होकेट प्रकाश आंबेडकर यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. महिलांना मासिक 3500 रुपये वेतन, शेतमालाला हमीभाव देणारा कायदा, जात जणगणना करून मंडल आयोगाची शंभर टक्के अंमलबजावणी, बौद्ध अनुयायांना मोफत धम्म सहल अशा विविध मुद्द्यांचा या जाहीरनाम्यात समावेश आहे. वंचित बहुजन आघाडीचा जाहीरनामा राज्यातील जनता स्वीकारेल आणि वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना मोठ्या प्रमाणात मत देईल असा विश्वास आंबेडकर यांनी यावेळी व्यक्त केला.

**<u>हिवाळी अधिवेशन</u>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला येत्या 25 नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या अधिवेशनाचं कामकाज 20 डिसेंबरपर्यंत निश्चित करण्यात आलं आहे, अशी माहिती केंद्रीय संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू यांनी काल समाज माध्यमावरच्या संदेशात दिली. भारतीय संविधानाचा स्वीकार करण्याच्या घटनेला 26 नोव्हेंबर रोजी 75 वर्षे पूर्ण होत आहेत; त्याचा अमृतमहोत्सवी सोहळा साजरा केला जाणार असल्याचंही रिजीजू यांनी सांगितलं.

**<u>पोलीस महासंचालक</u>**

राज्याच्या पोलीस महासंचालक पदावर संजय वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वर्मा 1990 च्या तुकडीचे भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी आहेत. सध्या ते कायदा आणि तंत्रज्ञान विषयक पोलीस महासंचालक म्हणून कार्यरत आहेत. एप्रिल 2028 मध्ये ते निवृत्त होणार आहेत. काँग्रेस आणि इतर पक्षांनी केलेल्या तक्रारीनंतर केंद्रीय निवडणूक आयोगानं रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालक पदावरून हटवण्याचे आणि त्यांची तत्काळ बदली करण्याचे आदेश दिले होते. तसंच विवेक फणसळकर यांच्याकडे या पदाचा तात्पुरता कार्यभार सोपवला होता.

**<u>भावे पदक-सांगली</u>**

मराठी रंगभूमी दिनाच्या औचित्याने, अखिल महाराष्ट्र विद्यामंदिर समितीच्या वतीनं दिलं जाणारं विष्णुदास भावे गौरव पदक ज्येष्ठ रंगकर्मी सुहास जोशी यांना काल सांगलीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात प्रदान करण्यात आलं. शंभराव्या अखिल

भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉक्टर जब्बार पटेल यांच्या हस्ते सुहास जोशी यांना सन्मानित करण्यात आलं. विष्णुदास भावे गौरव पदक, पंचवीस हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि शाल असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. अखिल महाराष्ट्र नाट्य विद्या मंदिर समितीचे अध्यक्ष डॉक्टर शरद कराळे आणि आगामी मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर यावेळी उपस्थित होत्या. यावेळी आपल्या भाषणात सुहास जोशी म्हणाल्या.......

**<u>एस. चोक्कलिंगम</u>**

विधानसभा निवडणुकीसाठी 20 नोव्हेंबरला मतदान होत असून मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी सर्व विभागांनी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या जनजागृतीच्या मोहिमेत सहभागी व्हावं असं आवाहन मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी काल मुंबईत केलं. विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक काल त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली; त्यावेळी ते बोलत होते. मतदार जागृतीसाठी येत्या आठ तारखेपासून मतदानाच्या दिवसापर्यंत विशेष मोहीम राबविली जाणार आहे, असं त्यांनी सांगितलं. निवडणूकीसाठी यंत्रणेची सर्व तयारी पूर्ण झाली असल्याचंही त्यांनी सांगितलं. राज्यात 9 कोटी 70 लाख 25 हजार 119 मतदारांची नोंदणी झाली आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीसाठीची आचारसंहिता लागू झाल्यापासून आजवर एकंदर 46 हजार 630 जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली असून या कालावधीत राज्यात 252 कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<u>मतदान जनजागृती- कोल्हापूर</u>**

विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढावा यासाठी काल कोल्हापूरमध्ये सायकल फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. यात 150 सायकलस्वारांनी आपला सहभाग नोंदवून मतदानाबाबत जनजागृती केली. जिल्हयात एकंदर 3452 मतदान केंद्र आहेत. प्रत्येक मतदारानं 20 नोव्हेंबर रोजी मतदान करावं आणि जिल्ह्याची उच्चांकी मतदानाची परंपरा या वेळी देखील कायम ठेवावी असं आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी यावेळी केलं. यावेळी उपस्थितांना मतदानाची शपथ देण्यात आली.

**<u>पालखी-धाराशिव</u>**

धाराशिव तालुक्यातील तेर इथल्या श्री संत गोरोबा काका कुंभार यांच्या पालखीचं काल धाराशिवमध्ये मोठ्या भक्तीभावानं स्वागत करण्यात आलं. ही पालखी कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे मार्गस्थ झाली. भाऊबीजेच्या दुसऱ्या दिवशी ही पालखी तेरहून निघून कार्तिकी एकादशीला पंढरपुरात पोहोचते.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.